शिवनेरी महाविद्यालय शिरूर अनंतपाळ जि. लातूर

सेमिस्टर – 4 (IV)

07/10

विषय – भूगोल

पेपर – Settlement Geog. दि :- (2022-23)

गुण – 10

नाव – पेंटमशेटे प्रियंका नवनाथ

BASY.

प्र. 1) वस्ती भूगोलाची व्याख्या सांगुन व्याप्ती व स्वरूप स्पष्ट करा.

मानवी भूगोलामध्ये मानवी वस्तीच्या अभ्यासास खुप महत्त्व आहे. जगातल्या कोणत्याही प्रदेशातील वस्तीच्या स्वरूपावर त्या प्रदेशातील पर्यावरणाचा सखोल असा परिणाम होतो. म्हणून त्या त्या प्रदेशातील पर्यावरणारूप मानवी वस्तीचे स्वरूप आढळते. यातुन मानवाचा पर्यावरणाशी असणारा संबंध स्पष्ट होतो. स्थळानुसार आणी काळानुसार विविध क्षेत्रात होत असलेल्या प्रगतीचा परिणाम मानवी वस्तीवर होतो आणी त्याला अनुसरून वस्त्यांचे स्वरूप बदलत जाते. म्हणून स्थळानुसार आणी काळानुसार विविध क्षेत्रात होत असलेली प्रगती वस्तीमधुन प्रतिबिंबीत होत असते. वस्तीमध्ये मानवाचा पर्यावरणाशी असलेला संबंध प्रतिबिंबित होतो. [एवढेच] नाही तर मानवी समाजाच्या धार्मिक, सामाजिक आणी सांस्कृतिक प्रथा किंवा चालीरिती ही प्रतिबिंबीत होत असतात. म्हणूनच मानवी भूगोलामध्ये मानवी वस्तीचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

व्याख्या खालीलप्रमाणे आहेत :-

1) मानवाच्या आश्रयस्थानास वस्ती असे म्हणतात.

2) मानवाने निवाऱ्याकरीता केलेल्या घरांच्या समुहांची मांडणी म्हणजे वस्ती होय.

3) गृहसमूह, रस्ते, वाड्या, चौक आणी समाज यांचे संकलीत रूप म्हणजे वस्ती होय.

4) डिकीन्सन या वस्ती भूगोलतज्ञाने वस्तीची व्याख्या खालील प्रमाणे केलेली आहे.

खेडवाड्या, गृहसमुह, नगरे इत्यादी मानवी समाजास आवश्यक असलेल्या सामाजिक, भौगोलिक घटकांची क्षेत्रीय व्यवस्था म्हणजे वस्ती होय.

वस्तीच्या वरील वेगवेगळ्या व्याख्यावरून असे स्पष्ट होते की, मानवाने निवाऱ्याची गरज पूर्ण करण्यासाठी केलेली घराची मांडणी म्हणजे वस्ती असते. दिवसभर श्रम केल्यानंतर मानवास विश्रांतीची गरज असते आणी ती गरज तो वस्तीमधून पुर्ण करीत असतो. मानसिक शांतता आणी स्वास्थ्य लाभण्यासाठी विश्रांती किंवा आश्रय आवश्यक असतो. त्यामुळेच मानवाच्या आश्रयस्थानास वस्ती म्हणतात. वस्ती हे घरे आणी समाज यांचे संकलित रूप असुन ती सामाजिक व भौगोलिक घटकांची क्षेत्रीय व्यवस्था असते.

मानव हा समाजशील प्राणी आहे. तो समुहाने जगणे पसंत करतो. यातुनच सामाजिक बांधिलकीच्या सामाजिक गरजा निर्माण होतात. सामाजिक गरजेतुन लोक एखाद्या ठिकाणी एकत्रित येवुन विशिष्ट पद्धतीने घरे बांधतात, अशा घरांच्या मांडणीलाच वस्ती म्हणतात. वस्ती ही अतिशय स्थायी किंवा विशेष असु शकते, तसेच ती तात्पुरती किंवा कायमस्वरूपी असु शकते. वस्ती ही कशीही असली तरी तिचा मुख्य उद्देश निवारा असतो.

वस्तीची आवश्यकता का भासली ?

मानवी वस्तीच्या उत्क्रांतीचा किंवा विकासाचा अभ्यास केल्यावर असे स्पष्ट होते की, साधारणपणे खालील उद्देशांची पुर्तता करण्यासाठी मानवास वस्तीची आवश्यकता भासली.

Page No. : VEDHA
Date : / /

5) विविध व्यवसाय करण्यासाठी.
6) सामाजिक, सांस्कृतिक आणी शैक्षणिक कार्यासाठी.
7) प्रशासन कार्यासाठी.
8) शारिरीक आणी मानसिक गरज भागविण्यासाठी.

दिवसभर काम केल्यानंतर मानवास निद्रा आणी आवश्यक असतो. त्यासाठी मानव वस्ती निर्माण करतो. थंडी, ऊन, जोराचा वारा, पाऊस इत्यादी प्रतिकुल हवामानापासुन तसेच जंगली हिंस्र श्वापदापासुन व शत्रुपासुन स्वतःचे संरक्षण करण्यासाठी तो वस्ती करून राहतो. मानवास जगण्यासाठी विविध व्यवसाय करावे लागतात. हे व्यवसाय पार पाडण्यासाठी त्यास वस्तीची आवश्यकता असते. विविध व्यवसायातुन कमाविलेल्या आर्थिक संपत्तीचे आणी इतर मालमत्तेचे जतन व संग्रह करण्यासाठी घरे किंवा वस्ती आवश्यक ठरतात. मानव समुहाने जगतो, समुहाने जगत असताना त्यास विविध प्रकारचे सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक कार्य पार पाडावी लागतात. तसेच शारिरीक व मानसिक गरजांची पुर्तता करण्यासाठी वस्त्या आवश्यक ठरतात. म्हणुन थोडक्यात आपण म्हणू शकतो की, झोप, विश्रांती, संरक्षण, स्वास्थ्य, शांतता, संपत्तीचे जतन, सामुहिक जीवन, शारिरिक व मानसिक गरजांच्या उद्देशातुन मानवास वस्तीची आवश्यकता भासली. यातुनच पृथ्वी तलावर वस्त्या अवतरल्या व विकास पावल्या.

वस्ती भूगोलाचे स्वरूप :-

वसाहत भूगोलाचे स्वरूप गतिमान ठरते. वसाहतीमधील पारंपारिक अनुबंध, वसाहत व परिसराचा भौगोलिक संबंध वेगवेगळे असल्याने त्यात स्थल व कालसापेक्षता असते. या अभ्यासाने वसाहत भूगोलाला पुर्णत्व प्राप्त होते. पृथ्वीवरील जलप्रणाली, भुमिस्वरूपे हवामान या तीन मुख्य घटकातील बदलांची परिवर्तने वसाहतींना सोसावी लागतात. तसेच मानवाची ज्ञानकक्षा यात वाढत असल्याने अशा बदलांचे प्रतिबिंब वसाहतीमध्ये उमटत जाते. याचे पर्यवसान वसाहतींच्या आकृतिबंधावर, भूमिउपयोजनावर व कार्यावर विपरीतपणे होऊन त्यास वसाहतींच्या विविध समस्या वसाहत भूगोलाच्या अभ्यासात अग्रक्रमाने उलगडल्या जातात.

सांस्कृतिक ...

विविध कार्य :-

नागरी व ग्रामीण वसाहतींचे पर्यावरणीय संबंध, विविध कार्ये असणाऱ्या विविध वसाहतींच्या वस्थान व्यक्ती, विचार प्रवाह, सेवा-सुविधा, माल उत्पादनेचे यांच्या अभिसरण ओघामुळे नाना तऱ्हेने आर्थिक व सामाजिक प्रश्न निर्माण होतात. या समस्या नीट ओळखून त्यांचा संबंध वसाहतीच्या किंवा वसाहतींच्या कोणत्या अंशाशी निगडित आहे. (स्थान, रचना, कार्य, विकासाची अवस्था) याविषयी वसाहत भूगोलात शास्त्रीय मंथन केले जाते. वसाहतींच्या स्थापनेची पार्श्वभूमी, पूर्वीच्या समस्या; रचनेतील दोष व सध्याचे वसाहतीचे स्वरूप लोकसंख्येचा वाढलेला ताण व तंत्रज्ञानातील होत असलेल्या बदलांमुळे आवश्यक वाटणारे बदल यांचा या ज्ञानशाखे विस्तृत विचार केला जातो.

मानवी भूगोलात मानव पर्यावरणसंबंधाची उकल होत असल्याने हल्ली वसाहतींच्या अभ्यासाला फार महत्त्व प्राप्त झालेले आहे. वसाहत भूविज्ञान ही मानवी भूगोलाची प्रमुख अतिशय प्रगत शाखा मानली जाते. मानवी वसाहतींचे प्रकारचे नाना प्रकार आढळतात. वसाहती ची सामूहिक रचना किंवा आकृतिबंधदेखील असतात. भौगोलिक घटक व मानवाचा अधिवास यांच्यात घनिष्ट नाते असते. कोणत्याही अधिवासात नैसर्गिक व मानवी स्थान-प्रतिसादांचा वैशिष्ट्यपूर्ण मिलाप असतो. विकासित भौगोलिक प्रदेशात सघन वसाहती तर औद्योगिक भागात प्रचंड महानगरांच्या मालिका आढळतात. लहान-मोठ्या कोणत्याही अधिवासांना विशिष्ट असे व्यक्तिमत्त्व प्राप्त होते. म्हणून वसाहतीचे स्थान, भूरचना, भूगर्भरचना, हवामान वनस्पती व प्राणी यांच्या संदर्भात मानवी वसाहतींचा भूगोल अभ्यास वसाहत भूविज्ञान केला जातो.

सांस्कृतिक स्वरूप :-

वसाहत भूविज्ञानात मानवाचे सांस्कृतिक चित्रण अभ्यासले जाते. या सांस्कृतिक चित्रणाचे वसाहत म्हणजे एक प्रतीक असते. एखादी वसाहत निर्माण झाल्यावर कालानुसार तिचा विकास होत जातो. विकासाचा वेग व पातळी सर्व वस्त्यांच्या बाबतीत सारखी नसतात

ऐतिहासीक स्वरूप :-

वसाहतीचा उगम, विकास आणी वाढ :- हडसन या शास्त्रज्ञाने वसाहतींना सजीवांची उपमा दिली आहे, ही उपमा वसाहत भूगोलाचे स्वरूप प्रदर्शित करते. कारण प्रत्येक वसाहत सजीवांप्रमाणेच उदगम (जन्म), वाढ (विकास), ऱ्हास व अंत अशा अवस्थांमधुन जाते. जगात अनेक वसाहती कालप्रवाहात अस्तंगत आल्या. तर अनेक वसाहतींचा उदगमही झाला. वसाहत भूगोलात वसाहतीचा उदगम विकास, ऱ्हास व अंत या विविध अवस्थांचा सखोल अभ्यास केला जातो. हा अभ्यास स्थल व काल या दोन घटकांच्या संदर्भात असल्याने वसाहतीचे स्वरूप कळवण्यास मदत होते. वस्तुतः वसाहतीच्या कार्यामुळे प्रादेशिक विकासात फरक पडतो. समतोल विकास साधण्यासाठी प्रादेशिक विकासातील फरक कमी करावा लागतो. काळजीगरज म्हणून विशिष्ट वसाहतींचे संयोजन करणे, सोईसुविधा उपलब्ध करून देणे, अनियमित स्थलांतराला आळा घालणे व वसाहत नियोजनावर भर देणे यांसारखी ~~उद्~~ उद्दिष्ट्ये डोळ्यांसमोर ठेवून वसाहत नियोजन करणे ही आधुनिक काळाची गरज झाली आहे.

भूगोलाचा प्राकृतिक भूगोल (हवामानशास्त्र, भुरूपशास्त्र वातावरणशास्त्र, मृदा, भूगोल, जैविक भूगोल, सागरी भूगोल) व मानवी भूगोलाच्या (राजकिय भूगोल, आर्थिक भूगोल, लोकसंख्या भूगोल, सांस्कृतिक भूगोल) या विविध शाखांशी भूगोलाचा अन्योन्य संबंध आहे. या शाखांच्या ज्ञानाद्वारे वसाहतीच्या विविध प्राकृतिक व मानवी अंगांचा उलगडा व्हायला मदत होते.

याशिवाय पर्यावरणाची तमा न बाळगता विकृत दिशेनी जाऊ पाहणारी संगणक युगातील मानवाची झेप हा वसाहत अभ्यासाचा एक काळजीचा विषय आहे. नागरी पर्यावरणातील प्रदुषित वातावरण, कॉंक्रीट इमारती, अनियोजित रचना, झोपडपट्ट्या यांसारखे विविध

Page No.
Date: / /

भूगोलाचे स्वरूप अतिशय व्यापक व आंतरविद्या-शाखीय असुन सर्वस्पर्शी आहे.